महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2870120-21 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/ 673 /2026-27 दिनांक - 08/04/2026

## -:योजनेचा तपशील:-

**महाज्योती मार्फत "महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट ब (अराजपत्रित सेवा)" पूर्व परीक्षा - 2025 उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी मुख्य परीक्षेकरीता अर्थसहाय्य योजनेचा तपशील"**

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील **"महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट ब (अराजपत्रित सेवा)" पूर्व परीक्षा** - 2025 (जाहिरात नं.117/2025 दि.23/03/2026 रोजी MPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) उत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरीता एकरकमी अर्थसहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

- **योजनेच्या लाभासाठी पात्रता:**
  1. विद्यार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
  2. विद्यार्थी हा नॉन-क्रिमिलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी असावा.
  3. विद्यार्थी हा **"महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट ब (अराजपत्रित सेवा)" पूर्व परीक्षा** - 2025 (दि.23/03/2026 रोजी MPSC ने जाहीर केलेल्या निकालानुसार) उत्तीर्ण झालेला असावा. ज्या विद्यार्थ्यांना सदर परीक्षेकरिता इतर संस्था/सारथी, पुणे यांचेकडून अर्थसहाय्य मिळत असल्यास अश्या विद्यार्थ्यांना सदर योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाही.

- **अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे:**
  1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसहित)
  2. जातीचा प्रमाणपत्र (Caste Certificate)
  3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
  4. "महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट ब (अराजपत्रित सेवा)" पूर्व परीक्षा - 2025 चा प्रवेश पत्र
  5. "महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट ब (अराजपत्रित सेवा)" पूर्व परीक्षा - 2025 उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक करुन देण्यात यावे.

- **अर्ज कसा करावा**.

    1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified For MPSC Secondary Services Mains - 2025" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.

    2. अर्जासोबत वरील नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

- **अटी व शर्ती** :

    1. अर्ज करण्याचा **अंतिम दि**.20/04/2026 आहे.
    2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
    3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
    4. कोणत्याही माध्यमातुन व अंतिम निवड प्रक्रियेच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण किंवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास तो/ती विद्यार्थी कायदेशीर कारवाईस पात्र राहिल.
    5. विद्यार्थ्यांचे बॅंक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.
    6. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा :
       0712-2870120/21.
       E-mail Id : mahajyotingp@gmail.com

(स्वा.)
(मिलिंद नारिंगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.